**" मार्च २०२२" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ०३ मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र धोरण संशोधन संस्था या कार्यालयाकरिता नवीन लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ०३ मार्च २०२२ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४ अंतर्गत प्रशिण घेतलेल्या दोन मुख्याधिकारी, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ०९ मार्च २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये पदोन्नतीचे प्रस्ताव जलद गतीने निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक ०९ मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्या कार्यालयातील अस्थायी पदांना मुदतवाढ देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १० मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय वर्ष २०२१-२२ करीता महाराष्ट्र धोरण संशोधन संस्थेच्या माध्यमातून झालेल्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन सहायक अनुदान वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २२ मार्च २०२२ च्या शासन आदेशान्वये राज्यात कार्यरत अ.भा.से. तील अधिकाऱ्यांविरूध्द लैंगिक छळाच्या तक्रारींच्या चौकशींचे संनियंत्रण करण्याकरिता मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे.
- दिनांक २४ मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतूदीतून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, यशदा पुणे, ६ विभागीय व ३४ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना प्रशासकीय प्रशिक्षणाकरिता, (प्रशिक्षण शुल्क) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता वित्तीय मान्यता देऊन, एकूण रू.२,७९,७२,९५० /- इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २४ मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता आर्थिक वर्ष सन २०२१-२२ साठी यशदा, पुणे या संस्थेस अनुदान वितरित करण्यास(वेतनेतर) मंजूरी देण्यात आली आहे.
- दिनांक २५ मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम वित्तीय वर्ष २०२१-२२ करीता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत पायाभूत प्रशिक्षण व मुंबई विद्यापीठाची सत्र-१ परिक्षा या आठ आठवड्यांच्या प्रशिक्षणाकरिता ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) या बाबीखाली रू.१,४१,५५,०००/- इतका अनुदान वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २८ मार्च २०२२ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ (सीपीटीपी-३) अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या एकूण ४ उपजिल्हाधिकारी, गट-अ या संवर्गातील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक २८ मार्च २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०२१ व सन २०२२ मधील पात्र सहायक कक्ष अधिकारी यांच्या "कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०२२" च्या परीक्षा आयोजित करण्यात आला आहे.
- दिनांक २९ मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये यशदा, पुणे व डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती, या संस्थांना सन २०२१-२२ या वर्षासाठी (अनिवार्य) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) करिता अनुक्रमे रू.२३५.२३ लाख व रू.६.६२ लाख इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ३० मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय वर्ष २०२१-२२ यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६- सहाय्यक अनुदान ( वेतन ) या बाबीखाली जानेवारी २०२२ ते मार्च २०२२ करीता अनुदान वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ३० मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय वर्ष २०२१-२२ वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत पायाभूत प्रशिक्षण व मुंबई विद्यापीठाची सत्र-१ परिक्षा या आठ आठवड्यांच्या प्रशिक्षणाकरिता ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) या बाबीखाली पुनर्विनियोजनाद्वारे रू.१,३३,७६,०००/- इतके अनुदान वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक ३१ मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस योजनांतर्गत मंजूर तरतूदीमधून प्रेक्षागृहाचे इमारतीकरिता ध्वनीक्षमण यंत्रणेचे बांधकाम, फर्निचर व वातानुकुलित यंत्रणा इत्यादीच्या बांधकामाकरिता प्रशासकीय व वित्तीय मान्यतेच्या अनुषंगाने सन २०२१-२२ करिता रू.११३.४९ लाख इतका निधी वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ३१ मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस योजनांतर्गत मंजूर तरतूदीमधून प्रशिक्षणार्थी क्षमतेच्या वसतिगृहाकरिता वातानुकूलित यंत्रणा बसविण्याकरिता प्रशासकीय व वित्तीय मान्यतेच्या अनुषंगाने सन २०२१-२२ करिता रू.१,०८,५९,१३३/- इतका निधी वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

**(ख) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- एकूण पाच अधिकाऱ्यांना अवर सचिव पदावर प्रपत्र पदोन्नती देण्यात आली आहे.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या एका लिपिक-टंकलेखकाचे नियतवाटप रद्द करण्यात आले आहे.

**(ग) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- एका उप सचिवांच्या बदलीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ)प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- एका उप जिल्हाधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एका लिपिक-टंकलेखकाच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- एकूण पाच लिपिक-टंकलेखकांना त्यांच्या मूळ विभागात प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एकूण चार सहायक कक्ष अधिकारी यांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.
- एका अवर सचिवांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

**(च)ज्येष्ठतासूची**

- मंत्रालयीन विभागातील वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक ०१.०१.२०२२ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे.
- मंत्रालयीन विभागातील लघुटंकलेखकांची दिनांक ०१.०१.२०२२ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे.
- मंत्रालयीन विभागातील निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक ०१.०१.२०२२ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे.
- मंत्रालयीन विभागातील उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक ०१.०१.२०२२ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे.
- कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र सहायक कक्ष अधिकारी यांची दिनांक ०१.०१.२०२१ रोजीची तात्पूरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे.

*****